# पोलीस आयुक्त कार्यालय

कक्ष -९ (कनिष्ठ आस्थापना / भरती कक्ष),
नवीन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, डॉ दा.नौ.मार्ग, बृहन्मुंबई – ४००००१
दूरध्वनी क्र. ०२२ २२६२०१११, विस्तारीत क्र. ७०४ ई-मेल– desk9recruitcell.mum@mahapolice.gov.in

जा.क्र.पोआ/कक्ष-९(पोभ)/९(१)/१७/२०२५, दि.०४ / ०१ /२०२५.

## मुंबई पोलीस शिपाई/पोलीस शिपाई (चालक)/कारागृह शिपाई भरती २०२२-२३

विषय :- मुंबई पोलीस शिपाई/पोलीस शिपाई (चालक)/कारागृह शिपाई भरती २०२२-२३ लेखी परिक्षोसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचे प्रवेश पत्र पाठविणेबाबत.

संदर्भ :- १) क्र.अपोमसं/प्रशिक्षण/पो.शि.भरती २०२२-२३/१७३/२०२३, दिनांक ०६/०६/२०२४.
२) जा.क्र.पोआ/कक्ष-९(पोभ)/९(१)/२५७३, दिनांक ०८/१०/२०२४.
३) जा.क्र.पोआ/कक्ष-९(पोभ)/९(१)/२५७४, दिनांक ०८/१०/२०२४.
४) जा.क्र.पोआ/कक्ष-९(पोभ)/९(१)/३०७५, दिनांक २०/१२/२०२४.

उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये मा.पोलीस महासंचालक कार्यालयाकडून निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रकातील नियमांचे तसेच प्रचलित शासन निर्णय व महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ व सुधारित नियम २०२१ मधील तरतुदींनूसार मुंबई पोलीस शिपाई/कारागृह शिपाई भरती २०२२-२३ च्या मैदानी चाचणी प्रक्रियेत उत्तीर्ण होऊन लेखी परिक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी संदर्भ क्र.२ व ३ अन्वये मुंबई पोलीसच्या संकेतस्थळावर प्रसिध करण्यात आली आहे. तसेच पोलीस शिपाई (चालक) भरती २०२२-२३ च्या मैदानी चाचणी व कौशल्य चाचणी प्रक्रियेत उत्तीर्ण होऊन लेखी परिक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी संदर्भ क्र.४ अन्वये मुंबई पोलीसच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

मैदानी चाचणी व कौशल्य चाचणी प्रक्रिया पूर्ण करुन लेखी परिक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परिक्षा मुंबई शहरातील विविध परिक्षा केंद्रांवर घेण्याचे प्रस्तावित होते. त्याअनुषंगाने पोलीस शिपाई (चालक) पदाची लेखी परिक्षा दिनांक ११/०१/२०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता, कारागृह शिपाई पदाची लेखी परिक्षा दिनांक ११/०१/२०२५ रोजी दुपारी २:३० वाजता आणि पोलीस शिपाई पदाची लेखी परिक्षा दिनांक १२/०१/२०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता घेण्यात येणार आहे.

मुंबई पोलीस शिपाई/पोलीस शिपाई (चालक) व कारागृह शिपाई पदाच्या लेखी परिक्षेकरिता पात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांना लेखी परिक्षेची प्रवेशपत्रे https://policerecruitment२०२४.mahait.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहेत.

सर्व उमेदवारांना सचित करण्यात येते की, https://policerecruitment२०२४.mahait.org या संकेतस्थळावरुन मुंबई पोलीस शिपाई/पोलीस शिपाई (चालक) व कारागृह शिपाई पदाच्या लेखी परिक्षेची प्रवेशपत्रे संबंधित उमेदवारांनी डाऊनलोड करुन घेऊन लेखी परिक्षेसाठी उपस्थित रहावयाचे आहे.

लेखी परिक्षेसंदर्भातील महत्वाच्या सुचना उमेदवारांच्या माहितीसाठी mumbaipolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

सही/-

**( कृष्ण कान्त उपाध्याय )**
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय-२)
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालय.